महाराष्ट्र पोलीस

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं/३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना/०७/२०२५, मुंबई,ई. स्वाक्षरीस नमुद

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन,महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक- मकचौ-२०२५/ प्र. क्र.२५/का-१५ दि. २२/०८/२०२५

**विषय :-** कामाच्या ठिकाणी महिलांच्या होणा-या लैगिंक छळवणूकीस प्रतिबंध च्या अनुषंगाने करावयाची कार्यवाही.

*****

महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक- मकचौ-२०२५/प्र.क्र.२५/का-१५ दि.२२/०८/२०२५.ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०८२२१६१५०१२९३० असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
PRAVIN MADHUKAR SHIKHARE
Date: 25-08-2025 17:04:33

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई. (सस्नेह)
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई(सस्नेह).
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक,(आस्थापना/कायदा व सुव्यवस्था/ नियोजन व समन्वय/आर्थिक गुन्हे/दहशतवाद विरोधी पथक/ विशेष कृती/ प्रशासन/ वाहतूक/ प्रशिक्षण व खास पथके / फोर्स वन नागरी हक्क संरक्षण/ सायबर सुरक्षा / रा.रा.पो.बल / महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग महाराष्ट्र राज्य, मुंबई.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गासह)
अपर पोलीस महासंचालक, व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.

विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई./ मोटर परिवहन विभाग, पुणे/ नक्षल विरोधी अभियान, नागपूर.

विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना/ कायदा व सुव्यवस्था/ प्रशासन/ प्रशिक्षण व खास पथके), महाराष्ट्र राज्य, मुंबई

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.

विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.

संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे.

सर्व पोलीस अधीक्षक ( गुन्हे/ बिनतारी संदेश/लोहमार्ग).

पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.

प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.

सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र.

सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १९.

सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु. / दक्षता/ धोरण/ नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

पोलीस महासंचालक यांचे सर्व वरिष्ठ उप सहायक / उपसहायक.

सर्व कार्यासन अधिकारी, का क्र.१ ते ४४.

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**कामाच्या ठिकाणी महिलांच्या होणाऱ्या लैंगिक छळवणूकीस प्रतिबंध च्या अनुषंगाने करावयाची कार्यवाही.**

**महाराष्ट्र शासन**
**महिला व बाल विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: मकचौ- २०२५/प्र.क्र.२५/का-१५**
नविन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २२ ऑगस्ट, २०२५.

**वाचा :-** १) शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग क्र. मकचौ-२०१३/प्र.क्र.६३/दि. १९.६.२०१४.
२) शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग क्र. मकचौ-२०१३/प्र.क्र.६३/दि. ११.९.२०१४.
३) शासन परिपत्रक क्र.रिटपी २०१८/प्र.क्र.८/का-१५,दि.२४.११.२०२३.
४) सहायक प्रबंधक,सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांचे पत्र डि क्र.२११८९/२०१२,दि.१३ मे, २०२३.
५)महिला व बाल विकास मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र.D.O.१६/३/२०२३-WW, दि.३०.५.२०२५.

**प्रस्तावना:-**

कामाच्या ठिकाणी महिलांच्या होणाऱ्या लैंगिक छळवणुकीस प्रतिबंध करण्यासंदर्भात केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने महिलांच्या तक्रारी दाखल करण्यासाठी खाजगी तसेच सार्वजनिक आस्थापनांमध्ये महिला तक्रार निवारण समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. महिलांच्या कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळवणुकीस प्रतिबंध करण्यासाठी या समित्यांच्या कार्यपध्दतीमध्ये अधिक सुलभता येण्यासाठी मार्गदर्शक सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण ( प्रतिबंध, मनाई व निवारण ) अधिनियम २०१३ व याबाबतचे नियम दि. ९.१२.२०१३ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत. या अधिनियमातील कलम ४ (१) अंतर्गत कामाच्या ठिकाणी महिलांच्या लेंगिक छळाच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी "अंतर्गत तक्रार समिती " बरोबरच कलम ६ (१) अंतर्गत जिल्हास्तरावर "स्थानिक तक्रार समिती" गठीत करण्याची तरतूद आहे. सदर तक्रार समित्या स्थापन करण्याबाबतच्या सूचना शासन निर्णय दिनांक ११.९.२०१४ अन्वये देण्यात आल्या आहेत.

तथापि काही खाजगी आस्थापनांमध्ये सदर कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. रिट याचिका क्र.२४८२/२०१४, दि.१३.५.२०२३ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने देखील खाजगी क्षेत्रातील आस्थापनांवर समित्या स्थापन करण्याबाबतची कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत. उपरोक्त बाबी विचारात घेता कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळास प्रतिबंध समित्यांच्या स्थापना करण्याच्या अनुषंगाने खालील प्रमाणे सूचना पुन:श्च देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय :-

कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई व निवारण अधिनियम २०१३ व नियम दि. ९.१२.२०१३ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत. या अधिनियमातील कलम ४ (१) अंतर्गत

कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळाच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी "अंतर्गत तक्रार समिती" बरोबरच कलम ६ (१) अंतर्गत जिल्हास्तरावर "स्थानिक तक्रार समिती" गठीत करण्यात तरतुद नमुद केली आहे. याबाबत वाचा येथील शासन निर्णय दि.१९.६.२०१४, दि.११.९.२०१४, व शासन परिपत्रक दि.२४.११.२०२३ अन्वये सूचना दिलेल्या आहेत. तथापि, काही शासकीय, निमशासकीय, खाजगी आस्थापनांकडून या सूचनांचे पालन झाल्याचे दिसून येत नाही. यास्तव ज्या शासकीय, निमशासकीय, खाजगी कार्यालय, संघटना, महामंडळे, आस्थापना, संस्था शाखा ज्यांची शासनाने स्थापना केली असेल किंवा त्यांच्या नियंत्रणाखाली असेल किंवा पूर्ण किंवा अंशत: प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष निधी शासनामार्फत किंवा, स्थानिक प्राधिकरण किंवा शासकीय कंपनी किंवा नगरपरिषद किंवा सहकारी संस्था यांना दिला जातो अशा सर्व आस्थापना, तसेच कोणतेही खाजगी क्षेत्र, संघटना किंवा खाजगी उपक्रम/ संस्था, एन्टरप्रायजेस, अशासकीय संघटना, सोसायटी, ट्रस्ट, उत्पादक, पुरवठा, वितरण व विक्री यासह वाणिज्य, व्यावसायिक, शैक्षणिक, करमणूक, औद्योगिक, आरोग्य, इत्यादी सेवा किंवा वित्तीय कामकाज पार पडणारे युनिट किंवा सेवा पुरवठादार, रुग्णालये, सुश्रुषालये, क्रिडा संस्था, प्रेक्षागृहे, क्रिडा संकुले इत्यादी ठिकाणी किंवा अधिनियम नमूद केलेल्या कामाच्या शासकीय व खाजगी क्षेत्रातील कार्यालयाच्या ज्या ठिकाणी तक्रार समितीची स्थापना करण्यात आलेली नाही अश्या ठिकाणी त्वरित तक्रार समितीचे गठण/पुनर्गठण करण्यात यावे.

२. PoSH Act.२०१३ च्या प्रभावी अंमलबजाबवणीसाठी शासकीय व खाजगी कार्यालयामध्ये स्थापन करण्यात आलेल्या "अंतर्गत तक्रार समिती" बाबतचा आढावा आयुक्त, महिला व बाल विकास यांच्या स्तरावर प्रत्येक महिन्यातून एकदा, सचिव, महिला व बाल विकास विभाग यांच्या स्तरावर तीन महिन्यातून एकदा व मा.मंत्री, महिला व बाल विकास यांच्या स्तरावर सहा महिन्यातून एकदा घेण्यात येईल.

३. PoSH Act.२०१३ च्या कलम-५ अन्वये सदर कायद्याची अंमलबजावणी करण्याचे अधिकार जिल्हा अधिकारी (District Officer) यांना असल्यामुळे "अंतर्गत तक्रार समिती" स्थापन केली नसल्यास PoSH Act.२०१३ मधील कलम-२६ नुसार दंडात्मक कारवाई ही संबंधीत जिल्हा अधिकारी (District Officer) स्तरावरुन करण्यात यावी.

४. सर्वोच्च न्यायालयाने M.A.No.(s) २२५५३/२०२३ in Civil Appeal No.२४८२/२०१४ Aureliano Fernandes Vs State of Goa and Others मध्ये दिलेल्या निर्देशास अनुसरुन केंद्रिय महिला व बाल विकास मंत्रालयाने प्रत्येक प्रशासकीय विभागाने PoSH Act.२०१३ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रत्येक मंत्रालयीन विभागाने त्यांच्या स्तरावर एका Nodal Officer ची नियुक्ती करावी अशा सूचना दिल्या आहेत.

त्यामुळे उपरोक्त सूचनेस अनुसरुन प्रत्येक मंत्रालयीन विभागाने त्यांच्या स्तरावर त्यांच्या क्षेत्रीय कार्यालयांकरीता एका Nodal Officer यांची नियुक्ती करावी. सदर Nodal Officer यांनी त्यांच्या व त्यांच्या क्षेत्रीय कार्यालयात PoSH Act.२०१३ ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही करावी.

५. PoSH Act.२०१३ अंमलबजावणी संदर्भात आयुक्त, महिला व बाल विकास यांच्या स्तरावर कामगार, उच्च व तंत्र शिक्षण, शालेय शिक्षण, उद्योग या तसेच आवश्यकतेनुसार इतर सबंधित विभागांतील अधिकाऱ्यांचा समावेश करुन एक समिती स्थापन करण्यात यावी. या समितीने PoSH Act.२०१३ च्या कायद्यातील नियमांच्या काटेकोर अंमलबजावणीच्या अनुषंगाने कोणती उपाययोजना करता येईल याबाबत एक अहवाल तयार करुन तो शासनास तीन महिन्याच्या आत सादर करावा.

६. कामगार विभागामार्फत दरवर्षी करण्यात येणाऱ्या ऑडिट मध्ये PoSH Act.२०१३ च्या अंमलबजावणी बाबतचे मुद्दे देखील अंतर्भूत करण्यात यावेत.

७. केंद्र शासनाच्या महिला व बाल विकास मंत्रालयाच्या दि.३०.५.२०२५ च्या पत्रान्वये SHE Box Portal वर पिडीत महिलेस तक्रार नोंदविण्यासाठी (https://shebox.wcd.gov.in) उपलब्ध करुन दिलेली Web Link सर्व मंत्रालयीन तसेच सर्व क्षेत्रीय स्तरावरील शासकीय, निमशासकीय व खाजगी आस्थापनांनी त्यांच्या संकेत स्थळावर व प्रचार प्रसिध्दीसाठी उपलब्ध असलेल्या अधिकृत माध्यमांवर (Social Media) उपलब्ध करण्यात यावी.

८. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक २०२५०८२२१६१५०१२९३० असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

SHIVAJI PANDURANG KARWAR

Digitally signed by SHIVAJI PANDURANG KARWAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WOMEN AND CHILD DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=46ec07554eac404147684ed8b27adc8a1c2a78fe8ffea3c9dd01377e25f76a36, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=579FDC49AAE09A107A14D18D2E6E7AEC6E608DE79CB8407CA0E64638BB98CDB0, cn=SHIVAJI PANDURANG KARWAR
Date: 2025.08.22 16:16:15 +05'30'

**( शिवाजी कारवार )**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत- मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.**
मा. मुख्यमंत्री महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. उपमुख्यमंत्री महोदयांचे सचिव,मंत्रालय , मुंबई.
मा. मंत्री (महिला व बाल विकास विभाग) यांचे खाजगी सचिव
मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई.
सर्व विभागाचे अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई.
सर्व विभागीय आयुक्त,
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई.
आयुक्त, महिला व बाल विकास , पुणे
सर्व विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास विभाग
सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई.
सचिव, निवडणूक आयोग, मुंबई.
सर्व जिल्हाधिकारी /सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व जिल्हा महिला बाल विकास अधिकारी
सर्व तहसिलदार
सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी (तालुका स्तर)
निवड नस्ती (मकक) कार्यासने-१५.